**नि.दिवाणी दावा क्रं.०५/२०११**
**नि. क्रं.१७७ लगत.**

**:: प्रतिवादी क्र.५ व ४ करिता अधिवक्ता श्री. महाजन यांनी यापूर्वीच खरेदीखत निशाणीबध्द झाल्याने पुढील सरतपास घेणे नाही असे सांगितले. सबब त्याची नोंद घेतली. ::**

**:: वादीकरिता उलटतपास अधिवक्ता श्री. आर.एम. पाटील यांच्यामार्फत शपथेवर सुरू ::**

०६. मी वर्ष १९८५ ते ९० या कालावधीत आमदार होतो. त्यामुळे या भागातील लोक माझे ऐकतात. मला वादी आणि प्रतिवादी हे माहिती आहेत. प्रतिवादी क्र.१ माणिक यांना दोन मुली आहेत व मुले नाहीत. प्रतिवादी क्र.२ नामदेव यांनी मला जमीन विकलेली आहे. त्यांना एक मुलगा आहे. परंतु त्यांनी मुलगी आहे किंवा कसे हे मला माहीत नाही. नामदेव हा आनंतवाडी येथे राहतो. तो शेती व्यवसाय करीत होता. मला नामदेवच्या कुटुंबाबाबत माहिती नाही. प्रतिवादी क्र.३ बालाजी हा नामदेवचा मुलगा आहे. प्रतिवादी क्र.४ ही माझी बहीण आहे. ती लातूर येथे राहते. वर्ष २०११ मध्ये तिचे लग्न झाले होते. मी जमीन विकत घेताना चौकशी केली नव्हती. नामदेवने कोणाकडून जमीन विकत घेतली होती हे मला माहीत नाही. नामदेवकडे एकूण किती एकर जमीन होती हे मला माहिती नाही. नामदेवची वडिलार्जीत जमीन होती किंवा कशी हे मला माहिती नाही. नमूद खरेदीखत हे ४ एकराला ५ गुंठे कमी क्षेत्रफळाचे होते. आता मला खरेदीखताचे वर्ष सांगता येत नाही. मी खरेदीखत बघून ते सांगू शकतो. मला खरेदीखतावरील साक्षीदारांची नावे सांगता येत नाहीत. खरेदीखतावर साक्षीदारांव्यतिरीक्त कोणी सह्या केल्या हे मला आठवत नाही.

०७. प्रतिवादी क्र.१ माणिक हा काय व्यवसाय करतो हे मला माहीत नाही. तो माझ्या मतदार संघातील आणि गावाच्या जवळचा आहे. त्याच्या घराण्याची मला ओळख आहे. माझी त्यांच्याशी चांगली ओळख नाही. मी नामदेव

आणि त्याच्या घराण्याला ओळखतो. परंतु माझी त्यांच्याशी चांगली ओळख नाही. वाद मिळकत मला खरेदी देण्यापूर्वी प्रतिवादी क्र.१ माणिकने माझी बहीण प्रतिवादी क्र.४ ला विकली होती. प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.४ कडून व्याजाने रक्कम घेतली हे मला माहिती नाही. (प्रतिवादीच्या वकिलांनी वादीचे सावकारी व्यवहारा बाबत कथन नसल्याने त्याबाबत प्रश्न विचारू नये अशी हरकत घेतली. वादीच्या वकिलांनी त्याबाबत कथन असल्याचे सांगितले, परंतु त्याबाबत दाव्यातील कथन दाखविले नाही. सबब वादीच्या वकिलांनी कथनाशिवाय यापुढे प्रश्न विचारू नये. याची नोंद घ्यावी.)

०८. प्रतिवादी क्र.१ माणिकच्या मुलींचे लग्न केव्हा झाले हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ च्या मुलीच्या लग्नाचे मला निमंत्रण होते. माणिकच्या मुलीचे वर्ष २००४ पूर्वीच लग्न झाले हा माझ्या शपथपत्रातील मजकूर कोणाच्या सांगण्यावरून लिहिला हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.४ ला तात्पुरत्या स्वरुपाचे खरेदीखत करून दिलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.४ ने खरेदी जमिनीवर ताबा केलेला नव्हता. परंतु प्रतिवादी क्र.४ च्या ताब्याबाबत तहसील कार्यालयामध्ये नोंद होती किंवा कसे हे मला माहीत नाही. प्रतिवादी क्र.४ ने खरेदीखत केल्याच्या वेळी मी मध्यस्थ नव्हतो. प्रतिवादी क्र.४ ने किती जमीन खरेदी केली होती हे मला माहीत नाही. मी प्रतिवादी क्र.४ कडून जमीन खरेदी केलेली नाही. मी प्रतिवादी क्र.२ कडून सोळा लाख काही रुपयामध्ये जमीन विकत घेतली आहे.

०९. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकत वादींची वडिलोपार्जित आहे. वादी हे त्यांच्या माहेरी अनंतवाडी येथे कधी आले आणि कधी येत होते हे मला माहीत नाही. मी अनंतवाडी येथे राहण्यास नव्हतो. मला वादींच्या अनंतवाडी येथे राहण्याबाबत चौकशी करण्याचा प्रसंग उद्भवला नव्हता.

१०. प्रतिवादी क्र.१ ला दारू पिण्याची सवय होती हे मला माहीत नाही. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्यातील खरेदी व्यवहाराबाबत मला माहिती नाही. मी स्वकमाईतून जमिनीत तलावातील माती टाकून चांगल्या प्रतिची केली, पाईपलाईन, विहीर व दोन बोअर करून जमीन बागायत केली आणि त्यास तारेचे कुंपण केले हे मी लेखी जबाब देते वेळी सांगितले होते. आता मला लेखी जबाब दाखविला. त्यामध्ये सदर मजकूर का लिहिला नाही याचे मी कारण सांगू शकत नाही. विहीर, बोअर व पाईपलाईन याबाबत महसूल अभिलेखामध्ये नोंदी झाल्या नाहीत. शेत बागायत असल्याबाबत ७/१२ पत्रकी नोंद नाही. हे म्हणणे खरे नाही की, शेतामध्ये विहीर, दोन बोअर आणि बागायत असल्याबाबत खोटे सांगितले.

११. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.२ हा नोकरीला होता. प्रतिवादी क्र.२ हा बाहेरगावी राहत होता हे मला माहीत नाही. प्रतिवादी क्र.२ हा अनंतवाडी येथे राहतो. प्रतिवादी क्र.१ ला कोणते कर्ज होते हे मला माहीत नाही. वादीच्या वडिलांनी स्वत: कर्ता म्हणून सदर जमिनी त्याच्या कर्ज अदाईसाठी विकल्या हा शपथपत्रातील मजकूर कोणाच्या सांगण्यावरून लिहिला हे मी सांगू शकत नाही. प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ विरुध्द सावकारीची केस केली होती हे मला माहीत नाही.

प्रश्न – तुम्ही ईतरांकडून सुध्दा जमिनी करून घेतलेल्या आहेत.

(वादीने प्रतिवादी क्र.५ च्या वर्तणुकीबाबत आणि कॅरेक्टर किंवा फ्रॉड केल्याचे दाव्यामध्ये कथन केलेले नाही. त्यामुळे सदर प्रश्न हा कथनाशिवाय ग्राह्य धरता येणार नाही. यापूर्वी सुध्दा संबंधित वकिलांना वादीच्या कथनाशिवाय प्रश्न विचारू नये याबाबत सूचित केले होते तरीसुध्दा त्यांनी सदर प्रश्न विचारला आणि विनाकारण वेळ वाया घातला. सबब पुन्हा त्यांना वादीच्या कथनाशिवाय प्रश्न

विचारू नये असे सूचित करण्यात आले आणि सदर प्रश्न नामंजूर केला.)

१२. मला वाद जमिनीच्या चतु:सिमा सांगता येतील. माझ्या जमिनीच्या पश्चिमेस – वलांडी–अनंतवाडी रस्ता आहे, दक्षिणेस – गावठाण, उत्तरेस – बळी पाटील यांनी जमीन व पूर्वेस व्यंकट बारजवळगे यांची जमीन आहे. सर्वे नं.१३ मध्ये माझी जमीन नाही. सर्वे नं.१३ मध्ये जमीन असल्याबाबत माझ्या शपथपत्रामध्ये मी सांगितल्याप्रमाणे लिहीले आहे. माझी सर्वे क्र.१४ मध्ये जमीन आहे. शपथपत्रामध्ये सर्वे क्रमांक १३ हे टंकलेखन दोष आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणत्या सर्वे नंबर मधील जमीन घेतली हे मला माहीत नाही.

प्रश्न – प्रतिवादी क्र.२ ने केव्हा जमीन घेतली व प्रतिवादी क्र.१ माणिकच्या मुलींचे लग्न केव्हा झाले.

(साक्षीदाराने यापूर्वीच सदर प्रश्नांचे उत्तर दिलेले आहे. त्याबाबत वारंवार विचारून वादीच्या वकिलांनी विचारून न्यायालयाचा वेळ वाया घातला. त्यामुळे पुन्हा त्यांना एकच प्रश्न पुन्हा विचारू नये असे सूचित केले आणि सदर प्रश्न नामंजूर केला.)

१३. वादीच्या लग्नाचा खर्च कोणी केला हे मला माहीत नाही. त्यासंबंधीत साक्ष शपथपत्रातील मजकूर कोणाच्या सांगण्यावरून लिहिला हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ला व्यसन असल्याने प्रतिवादी क्र.२ ने मला खोटे खरेदीपत्र करून जमीन विकली. वादी वर्ष २०१० पर्यंत वादी जमिनीमध्ये उत्पन्न घेत होते हे मला माहीत नाही. प्रतिवादी क्र.२ हा वर्ष २०१० पर्यंत वादींना पिकातील हिस्सा देत होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ ते ४ सोबत कायमस्वरूपी बैनामे केले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, वादींना कर्ज नव्हते. हे मला माहीत नाही की, वादीचे लग्न शेतीच्या उत्पन्नातून आणि पाहुण्यांच्या मदतीने झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.२ ने प्रतिवादी क्र.१ व वादी यांच्या तक्रारीला आळा

बसण्यासाठी माझ्या नावे जमिनीचे खरेदीपत्र केले. हे म्हणणे खरे नाही की, मी रक्कम न देता खरेदीखत केले. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीची जमीन हडप करण्यासाठी खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे ) ( श.अ. सुरजुसे )

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**.

दि. १०/१०/२०२५.